साप्ताहिक
# सामाजिक आढावा

PRGI No.: MHMAR/25/A3777 E-mail : samajikaadhawa@gmail.com Contact No.: 9921 924 924

वर्ष : 1 ले, अंक : 3 शनिवार, दिनांक : 20 डिसेंबर 2025 ते 26 डिसेंबर 2025 संपादक : विनायक विलास कालेकर मूल्य : 5 रूपये पाने 4

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला विविध विकासकामांचा आढावा



## श्री क्षेत्र भीमाशंकर येथील विकास कामे गतीने पूर्ण करण्याचे नियोजन करा– जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**पुणे : १८ डिसेंबर २०२५**

त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भाविकांची संभाव्य गर्दी विचारात घेता गर्दी व्यवस्थापन व इतर सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता विविध विकासकामे गतीने पूर्ण करण्याबाबत नियोजन करावे, विकासकामे करतांना गुणवत्तापूर्वक, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होतील याकडे लक्ष द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे श्री क्षेत्र भीमाशंकर विकास आराखडा (कुंभमेळा २०२७-गर्दी व्यवस्थापन व इतर सोई-सुविधा), विकास आराखडाबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, पुणे ग्रामीणचे उपधीक्षक दिलीप शिंदे, पुरातत्व विभागाचे सहायक संचालक डॉ. विलास वाहने, श्री क्षेत्र भीमाशंकरचे विश्वस्त यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

श्री. डुडी म्हणाले, श्री क्षेत्र भीमाशंकर येथे महसूल, पोलीस प्रशासन, सार्वजनिक बांधकाम, देवस्थानाचे पदाधिकारी आदींनी बैठक आयोजित करुन करण्यात येणाऱ्या कामकाजाबाबत माहिती देण्यात यावी. पोलीस प्रशासनाने वाहतूक नियोजन व गर्दी व्यवस्थापनाबाबत नियोजनाबाबत माहिती द्यावी. देवस्थानाच्या सूचना विचारात घेवून कार्यवाही करावी. कामाकरिता लागणाऱ्या आवश्यक त्या परवानग्या घेण्याची कार्यवाही करावी. पोलीस विभागाने नियंत्रण कक्ष उभारण्याबाबत कार्यवाही करावी.

श्री क्षेत्र भिमाशंकर येथे येणाऱ्या भाविकांकरिता असलेल्या सर्व बाजूंचा विचार करुन रस्त्याचे सर्वेक्षण करुन करावयाच्या कामकाजाबाबत अदांजपत्रक तयार करावे. पाणी पुरवठा विभागाने भाविकांना पुरेशा पाणी उपलब्ध होईल, याकरिता नियोजन करावे. एसटीपी बाबत सुधारित आराखडा तयार करुन मान्यतेकरिता सादर करावा. निगडाळे येथील भाविक सुविधा केंद्र व वाहनतळाचे कामे करावीत. भाविकाच्या राहण्याच्या दृष्टीने टेंट सिटी उभारण्याबाबत वाहनतळाची जागा सोडून इतरत्र ठिकाणाचे सर्वेक्षण करावे. एकूणच श्री क्षेत्र भीमाशंकर येथील सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने करतांना भाविकांना त्रास होणार नाही, यादृष्टीने नियोजन करावे, असेही श्री. डुडी म्हणाले.

यावेळी स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलीदान स्थळ तुळापूर व समाधी स्थळ स्मारक वढू बु , मालोजीराजे भोसले यांच्या गढीचे व हजरत चांद शाहवली बाबा दरगाह, श्री क्षेत्र जेजूरी गड तिर्थक्षेत्र, राजमाता सईबाई स्मृतीस्थळ, सदुंबरे येथील श्री संत जगनाडे महाराज समाधी स्थळ विकास व सौंदर्यीकरण, कुरवंडे येथील टायगर व लायन्स पॉइंट, हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखडा, अष्टविनायक गणपती मंदीराचा जीर्णोध्दार करण्याबाबतची आढावा घेण्यात आला. भुसंपादनाची कामे प्रलंबित असल्यास गतीने पूर्ण करावीत. येत्या पावसाळ्यापूर्वी सर्व कामे पूर्ण होतील याप्रकारे नियोजन करावे. कामे पूर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल दुरुस्तीचाही विचार करावा. अतिक्रमण असल्यास तातडीने काढून घ्यावीत, सर्व संबंधित विभागाने समन्वयानी कामे करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी दिले.

## मुख्यमंत्र्याचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याचे लोकार्पण

### मेट्रोच्या माध्यमातून कोंढवा परिसर इतर भागाशी जोडणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे : १५ डिसेंबर २०२५**

कात्रज-कोंढवा मार्गाचे काम लवकरात पूर्ण करण्यात येईल, मेट्रोच्या माध्यमातून कोंढव्याचा भाग इतर भागाशी जोडण्यात येईल. शिवाजी नगर ते येवलेवाडी मेट्रोमार्गाला मान्यता, स्वारगेट ते कात्रज मेट्रोमार्ग कोंढव्यापर्यंत आणणे आणि पुरंदर विमानतळाशी जोडणारी प्रस्तावित मेट्रोच्या माध्यमातून या भागाला जोडण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

श्री भैरवनाथ ग्रामविकास मंडळाच्या वतीने कोंढवा बु. येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार योगेश टिळेकर, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, चेतन तुपे, मंडळाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी महाराष्ट्राला स्वाभिमान शिकवला असे नमूद करून श्री. फडणवीस म्हणाले, ते एक दृष्टे नेते, राज्यकर्ते होते त्यांनी समतेचे राज्य निर्माण केले. स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करणाऱ्यांना कठोरातले कठोर शिक्षा करणारे त्यांचे शासन होते. त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली कोंढव्याची भूमी आहे, या भूमीवर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण होत असल्याचा आनंद



होत आहे. पुतळ्यामुळे कोंढवा बु. परिसरासह संपूर्ण महाराष्ट्राचे वैभव वाढले आहे.

ज्या काळात मोगलशाही, नीजामशाही, आदिलशाही असे परकीय आक्रमक मराठीभूमी, हिंदुस्थानावर आक्रमण करीत होते, त्यावेळी अनेक राजे आणि राजवाडे मुघलांचे मंडलिक म्हणून आधिपत्य स्वीकारत होते. अशा काळामध्ये जिजाऊ मासाहेबांच्या आशीर्वादाने छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य निर्माण करण्याची शपथ घेतली. अठरापगड जातीच्या नागरिकांना एकत्र करून, त्यांच्यामध्ये विजिगीषु वृत्तीचे रोपण करुन त्यांच्यामाध्यमातून हिंदवी स्वराज्य स्थापन केले. त्यानंतर छत्रपती संभाजी महाराजांनी मुघलांशी लढाई करुन स्वराज्याचे रक्षण केले. त्यानंतर ताराराणींनी झुंज कायम ठेवत मराठ्यांनी दिल्लीचे तख्तही काबीज केले. अटकेपार झेंडाही मराठ्यांनीच लावला. आम्हाला स्वाभिमान देणारे, महाराष्ट्राचा अभिमान असणारे शिवाजी महाराजांचा सिबीएससीच्या अभ्यासक्रमात २१ पानांचा जाज्वल इतिहासाचा समावेश केला आहे, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

श्री. टिळेकर म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत अश्वारुढ पुतळ्याच्या लोकार्पण झाले. राज्य शासनाच्या माध्यमातून कोंढवा परिसराचा पायाभूत विकास करण्यात येत आहे, असेही श्री. टिळेकर म्हणाले.

# संपादकीय...

## शैक्षणिक पाठ्यपुस्तके

शिक्षणपद्धतीत पाठ्यपुस्तकांची गरज भासते याचे कारण अध्ययन-अध्यापनाचे ते एक आवश्यक साधन आहे. पुस्तकाविना शिक्षण देता येईल काय, याचे प्रयोग अमेरिकेत करण्यात आले. तथापि पुस्तकांचे सहाय्य अपरिहार्य आहे, असाच निष्कर्ष त्या प्रयोगांतून काढण्यात आला.

वैदिक काळापासून भारतात गुरुकुलामध्ये किंवा आचार्यांपाशी विद्यार्थी प्राथमिक शिक्षणाकरिता जात असे. ही परंपरा या शतकापर्यंत चालू आहे. संस्कृत पाठशाला किंवा वेदपाठशाला यांच्यामध्ये प्रवेश झाल्यानंतर पठणाचा श्रेणीबद्ध कार्यक्रम लक्षात घेऊन गुरू शिकवितो. प्रथम रूपावली, समासचक्र, अमरकोश हे तोंडपाठ करून घ्यावयाचे. त्यानंतर पंचमहाकाव्यांपैकी कमी जटिल असे कालिदासाच्या रघुवंशाचे काही सर्ग शिकविल्यानंतर कुमारसंभव, भारवीच्या किरातार्जुनीयातील काही सर्ग, माघ कवीच्या शिशुपाल वधातील काही सर्ग व श्रीहर्षाच्या नैषध काव्यातील काही सर्ग यांचे पाठ द्यावयाचे. काही सर्गच शिकविण्याच्या मुळाशी हेतू असा, की विद्यार्थ्याला स्वतः वाचून संस्कृत समजण्याची पात्रता आली म्हणूजे स्वतःच्या बुद्धीनेच वरील सबंध काव्ये त्याला समजू शकतात.

त्यानंतर शाकुंतलासारखी नाटके गुरूकडून समजावून घ्यावयाची असतात. कारण नाटकांची रचना गुंतागुंतीची असते. भाषा नीट समजू लागली, म्हणजे मग सुसंगत रीतीने नाटकांचे ग्रहण करण्यास अडचणी येत नाहीत. त्यानंतर काव्यशास्त्राचे अध्यापन करतात व त्याबरोबरच व्याकरण शास्त्रामध्ये प्रवेश करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला त्याचे प्राथमिक ग्रंथ प्रथम शिकवितात. या शास्त्राचे समग्र आकलन होण्याकरिता आकरग्रंथ शिकवितात. वेदपाठाच्या अखेरीस त्या त्या वेदशाखेचे अर्थज्ञानावाचून पठन करून घेतले जाई.

सबंध वेदशाखा कंठस्थ झाली म्हणजे शिक्षा, व्याकरण, निरुक्त, छंदःशास्त्र, ज्योतिषशास्त्र आणि कर्मकांडाचे सूत्रग्रंथ या षडंगांचे पाठ वेदाध्यायन चालू असता किंवा त्यानंतर दिले जातात. त्याच्या योगाने विद्यार्थ्याला धर्मग्रंथ म्हणण्याची पद्धत आणि त्यातील अर्थाचे व्यवस्थित आकलन करता येते.

रोमन लोकांच्या जीवनात धर्मापेक्षा कायदा, साहित्य इत्यादींना विशेष महत्त्व होते व म्हणून पाठ्यक्रमात त्यांना महत्त्व आले. मध्ययुगात लॅटिनद्वारा सर्वज्ञान मिळवावे लागे. म्हणून लॅटिन व्याकरणाची पाठ्यपुस्तके (उदा., लिलिज ग्रामर, डोनॅट इ.) विशेष रूढ झाली. सॉक्रेटिस, प्लेटो यांच्यासारखी स्वतंत्र प्रतिभेची माणसे मात्र पाठ्यपुस्तकांना कमी लेखीत. पाठ्यपुस्तके स्मरणशक्ती दुबळी बनवितात व भिन्न भिन्न बौद्धिक पात्रतेच्या विद्यार्थांची बूज ती राखत नाहीत, असा प्लेटोचा आक्षेप होता. रुसोनेही पाठ्य पुस्तकांना गौण स्थानच दिले आहे. शाब्दिक ज्ञानावर आणि आप्तवाक्य प्रमाण्यावर भर देणाऱ्या प्रवृत्तीविरुद्ध ही प्रतिक्रिया होती. पाठ्य पुस्तकांच्या सुधारणेचा पहिला प्रयत्न कोमेनिअस (१५९२-१६७०) याने केला. त्याने पहिले सचित्र व सटीप पाठ्यपुस्तक तयार केले. बालकांना प्रत्यक्ष अनुभवाने म्हणजे वस्तुपाठाने शिकविण्याची पद्धत पेस्टालोत्सीने (१७४६-१८२७) सुरू केली. त्यामुळे मुलांसाठी तयार करावायाच्या पाठ्यपुस्तकांत क्रांती झाली म्हणूनच आधुनिक पाठ्यपुस्तकांच्या जनकत्वाचा मान त्याला दिला जातो. एकोणिसाव्या शतकात बहुतेक पाश्चात्य देशांत 'राष्ट्रीय शिक्षणपद्धती' सुरू झाली आणि मुद्रणकलेचाही विकास झाला. त्यामुळे पाठ्यपुस्तकांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला पण अध्यापनात घोकंपट्टीला अतिरिक्त महत्त्व आले, की पाठ्यपुस्तकां विरुद्ध प्रतिक्रिया व्यक्त होते. अमेरिकेत प्रगमनशील शिक्षणाच्या चळवळीत व भारतातील मूलोद्योग शिक्षणात कृतीला आणि क्रियाशीलतेला महत्त्व येताच पाठ्यपुस्तकांना गौणत्व आले. वस्तुतः ही प्रतिक्रिया पुस्तकी शिक्षणपद्धतीविरुद्ध आहे, असे म्हणता येईल.

पाठ्यपुस्तक कोणत्या वयाच्या विद्यार्थ्यांसाठी आहे व ते कोणत्या विषयाचे आहे, यांवरून त्याचे प्रकार व उपयोग निश्चित होतात. भाषाविषयाची पुस्तके अक्षरओळख वा भाषापरिचय, वाचनपाठ व साहित्यपरिचय अशा तीन प्रकारची असू शकतात. काही काही पुस्तके

क्रमश : पान क्र. ४

### पुणे : पुण्याला पुस्तकाची जागतिक राजधानी करणार- उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

पुणे पुस्तक महोत्सवाला मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता येत्या काळात पुणे ही पुस्तकाची राजधानी करण्यासाठी प्रयत्न करणार असून पुढील वर्षी हा महोत्सव जागतिक पुस्तक महोत्सव म्हणून आयोजित करण्याचा मानस असल्याचे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

नॅशनल बुक ट्रस्टच्या वतीने फर्ग्युसन महाविद्यालय येथे आयोजित तिसऱ्या पुणे पुस्तक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सहकार राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु सुरेश गोसावी, ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लेखक विश्वास पाटील, नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद मराठे, पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रमोद रावत, पुस्तक महोत्सव संयोजन समितीचे सदस्य, विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.

पहिल्या पुस्तक महोत्सवात सुमारे ११ कोटी रुपये, दुसऱ्या वर्षी ४० कोटी रुपयांची पुस्तक विक्रीद्वारे या पुस्तक महोत्सवाला प्रतिसाद वाढत असल्याचे सांगून श्री. पाटील म्हणाले, जगाची पुस्तकाची राजधानी पुणे व्हावी, याकरिता या वर्षीच्या जागतिक पातळीवर होणाऱ्या पुस्तकासंबंधित उपक्रमात पुणे पुस्तक महोत्सवाने सहभाग घेतला आहे. या उपक्रमाचे युनेस्कोमार्फत मूल्यमापन करण्यात येत आहे, त्यामुळे जागतिक पुस्तकाची राजधानी पुणे व्हावी याकरिता अधिकाधिक नागरिकांनी

### फर्ग्युसन महाविद्यालय येथे १३ ते २१ डिसेंबरदरम्यान आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन



पुणे महोत्सव खऱ्या अर्थाने भारतीय विचार, संवाद आणि संस्कृतीचा महोत्सव
केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

या महोत्सवाला भेट द्यावी. असे झाल्यास पुढच्या वर्षी पुणे पुस्तक महोत्सव हा जागतिक पुस्तक महोत्सव म्हणून आयोजन करण्यात येईल, या माध्यमातून जागतिक पातळीवरील प्रकाशक, लेखक या ठिकाणी येतील.

पुस्तक वाचनाचा आनंद मोठा असतो त्यामुळे ई-बुकच्या युगात पुस्तकाचे वाचन सुरुच राहील. मातृभाषा मराठी भाषेचा अभिमान वाटेल अशी भाषा आहे, देशात सुमारे १२ कोटी मराठी भाषिक आहेत, अशा मराठी भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी मराठी नाटक व चित्रपट पहावेत, साहित्याचे वाचन करावे, गीत ऐकावे, असे आवाहन श्री. पाटील यांनी केले.

श्री. मोहोळ म्हणाले, पुणे पुस्तक महोत्सवाला मागील दोन वर्षात वाचकांची मोठया प्रमाणात उपस्थिती, पुस्तकाची विक्रमी विक्री, साहित्य महोत्सवाच्या माध्यमातून विद्वतापूर्ण आणि वैचारिक मंथन घडवून आणणाऱ्या चर्चासत्राचे आयोजन तसेच विविध जागतिक विक्रम झाले असल्याने हा महोत्सव पुस्तक खरेदीचा महोत्सव न राहता खऱ्या अर्थाने भारतीय विचार, संवाद आणि संस्कृतीचा महोत्सव म्हणून ओळखला जात आहे.

ते पुढे म्हणाले, येथे देश विदेशातील विविध भाषेतील पुस्तके उपलब्ध आहेत, याचाच अर्थ पुणे हे साहित्य, कला, संस्कृती याच मानबिंदू असलेले शहर म्हणून ओळख आहे. या महोत्सवाकडे वाचन संस्कृतीला समृद्ध करण्याचे व्यासपीठ म्हणून बघितले जात असून पुणेकरांच्या मनात या महोत्सवाबद्दल आपुलकी निर्माण झाली आहे. अभिजात मराठी भाषासह सर्व भारतीय भाषेचे संवर्धन, नवोदित लेखकांना व्यासपीठ तसेच सर्व वयोगटात वाचन संस्कृती रुजविण्याचे काम या महोत्सवाने केले आहे. पुणे शहर हे ज्ञानाची, विचाराची आणि सांस्कृतिक परंपरेची नगरी असून या परंपरेला साजेसा वाचन महोत्सव पुणेकरांनी मनापासून स्वीकारला आहे, असेही ते म्हणाले.

या महोत्सवाच्या माध्यमातून भारतीय भाषेचे अनुवाद, साहित्यिकांच्या विचाराचे आदानप्रदान चालना, वैविध्यपूर्ण भारतीय साहित्य, संस्कृती आंतरराष्ट्रीय वाचकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होईल, येत्या काळात पुण्याला पुस्तकाची राजधानीचा दर्जा मिळण्यास मदत होईल तसेच दिल्ली येथे आयोजित आंतरराष्ट्रीय पुस्तक महोत्सवाच्या धर्तीवर पुढच्या वर्षी पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन होईल, अशा विश्वास श्री. मोहोळ यांनी व्यक्त केला.

विश्वास पाटील म्हणाले, दिल्ली आणि कलकत्ता येथील पुस्तक महोत्सवाप्रमाणे पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. हा भव्य महोत्सव आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन करुन येत्या काळात पुणे ही पुस्तकाची राजधानी होण्यास मदत होईल, असेही श्री. पाटील म्हणाले.

पुणे पुस्तक महोत्सवा मध्ये सुमारे ७५० हून अधिक पुस्तकाचे दालन आहेत. पुणे साहित्य महोत्सवात साहित्यक, कलाकार आदी सहभागी होणार आहेत, असे सांगून श्री. मराठे म्हणाले, पुणे पुस्तक महोत्सवाच्या धर्तीवर उपराजधानी नागपूर येथे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला. येत्या काळात गोवा येथे पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. वाचन संस्कृतीची चळवळ अशीच अखंडपणे पुढे चालत राहावी याकरीता प्रयत्न करणार आहोत, असेही ते म्हणाले.

श्री. पांडे म्हणाले, पुणे पुस्तक महोत्सवाला मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता हा 'पुणेकरांचा उत्सव' झालेला आहे. पुणे ही सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखली जाते; परंतु पुढच्या वर्षी पुणे ही पुस्तकाची जागतिक राजधानी म्हणून ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. पुणे साहित्य महोत्सवाचे १६ डिसेंबर पासून आयोजन करण्यात येणार असून सुमारे १५० हून अधिक नामवंत व्यक्ती सहभागी होणार आहेत, असेही श्री. पांडे म्हणाले.

यावेळी विश्वास पाटील लिखित 'लस्ट फॉर मुंबई' या कांदबरीचे अनावरण करण्यात आले.

### विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केली विजयस्तंभ परिसराची पाहणी



पुणे : हवेली तालुक्यातील पेरणे फाटा येथे १ जानेवारी रोजी होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या पुर्व तयारीची विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी विजयस्तंभ परिसरास भेट देऊन पाहणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप गिल, समाज कल्याणच्या आयुक्त दीपा मुंडे, बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी चंद्रकांत वाघमारे, पुणे शहर वाहतुक शाखेचे पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव, समाज कल्याण उपायुक्त वंदना कोचुरे, सहाय्यक आयुक्त तथा बार्टीचे निबंधक विशाल लोंढे, उपविभागीय अधिकारी यशवंत माने, तहसीलदार तृप्ती कोलते, लोणीकंदचे पोलीस निरीक्षक सर्जेराव कुंभार, यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी वाहनतळ व इतर व्यवस्थेची पाहणी करुन तेथील तयारीचा आढावा घेतला. विजयस्तंभ परिसरात नियोजनाशी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून सोईसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सूचना केल्या.

यावेळी पोलीस विभाग आणि विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व विविध संघटनाचे पदाधिकारी उपस्थित होते.

**सामाजिक आढावा** हे साप्ताहिक **मालक व प्रकाशक :** विनायक विलास कालेकर यांनी **मुद्रक :** सारस्वत आर्टस् ॲन्ड प्रिंटस्, ४६७ बुधवार पेठ, पासोड्या विठोबा मंदिराजवळ, तपकीर गल्ली, इलेक्ट्रिक मार्केट, पुणे ४११००२. महाराष्ट्र येथे छापून ४६७ बुधवार पेठ, पासोड्या विठोबा मंदिराजवळ, तपकीर गल्ली, पुणे ४११००२, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. न्यायलयीन कार्यक्षेत्र **पुणे न्यायालय** राहील **संपादक : विनायक विलास कालेकर, मोबाईल :** ९९२१ ९२४ ९२४

Weekly **SAMAJIK AADHAWA** Published by Owner Mr. Vinayak Vilas Kalekar **Printed at Saraswat Arts and Prints**, 467 Budhwar Peth, Near Pasodya Vithoba Mandir, Tapkir Galli, Pune : 411002, Maharashtra And Published at 467 Budhwar Peth, Near Pasodya Vithoba Mandir, Tapkir Galli, Electric Market, Pune 411002, Maharashtra.Subject to Pune Jurisdiction **Editor :** Vinayak Vilas Kalekar
**Contact** 9921 924 924 | **E-mail** :samajikaadhawa@gmail.com | **Website** : www.samajikaadhwa.com | **Youtube** : SamajikAadhawa | **PRGI : MHMAR/25/A3777**

## नगरपरिषद, नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता संपूर्ण यंत्रणा सज्ज

**मतदारांना मतदान करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन**

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**पुणे :** राज्य निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार लोकशाहीचा पवित्र उत्सव साजरा करताना मतदान अधिकाऱ्यांनी आपले कर्तव्ये जबाबदारीने बजाविण्याबाबत सूचना दिल्या आहेत; पात्र मतदारांनी निवडणुकीकरिता उत्स्फूर्तपणे मतदान करावे, नागरिक व राजकीय पक्षांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करून शांततेत पूर्ण प्रक्रिया पार पाडावी, संपूर्ण निवडणुकीच्या कामकाजाकरिता संपूर्ण यंत्रणा सुसज्ज आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या २९ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या आदेशानुसार नगरपरिषद, नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला असून त्यानुसार शनिवार, २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. यामध्ये बारामती आणि फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषदेकरिता पूर्ण निवडणूक तर लोणावळा, तळेगाव दाभाडे व दौंड या नगरपरिषदेच्या काही प्रभागांचा समावेश आहे.

या निवडणुकीत अध्यक्ष पदाकरिता बारामतीमध्ये १४ उमेदवार तसेच फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद येथे ७ उमेदवार आहेत. तसेच बारामती येथील ४१ जागांकरिता १५५ उमेदवार, फुरसुंगी-उरुळी देवाची येथील ३२ जागांसाठी १२० उमेदवार, दौंड येथील एका जागेसाठी (प्रभाग क्र.९ अ) ३ उमेदवार, लोणावळा येथील २ जागांसाठी (प्रभाग क्र. ५ ब व १० अ) ५ उमेदवार आणि तळेगाव दाभाडे येथील ५ जागांसाठी (२ अ, ८ अ, ८ ब, ७ ब व १० ब) १२ उमेदवार आहेत.

मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० असून आयोगाच्या निर्देशानुसार मतदानापुर्वी मॉक पोल घेतला जाणार आहे, निवडणुकीच्या प्रचार आज १९ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजता समाप्त होणार असून त्यानंतर प्रचार सभा, प्रचार फेऱ्या, ध्वनिक्षेपक आर्दीसह अन्य प्रकारे जाहीर प्रचार करता येणार नाही. तसेच नगरपरिषद, नगरपंचायतीं साठीच्या प्रचार समाप्तीनंतर आणि मतदानाच्या दिवशी म्हणजे २० डिसेंबर २०२५ रोजी मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे किंवा समाज माध्यमांमध्ये कुठल्याच प्रकारच्या जाहिराती प्रसिद्ध अथवा प्रसारित करता येणार नाहीत.

जिल्ह्यातील २ नगरपरिषदेकरिता पूर्ण निवडणूक व ३ नगरपरिषदेच्या काही प्रभागाची निवडणूक मिळून एकूण २३१ मतदान केंद्रे आहेत. यामध्ये एकूण २ लाख १२ हजार ३९६ मतदार (पुरुष-१ लाख ८ हजार ३१० तर महिला १ लाख ४ हजार ५६ व इतर ३०) मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात १९ डिसेंबर २०२५ च्या अधिसूचनेद्वारे शासनाने २० डिसेंबर २०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. ही सार्वजनिक सुट्टी मतदार संघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामासाठी त्या मतदार संघाच्या बाहेर असतील त्यांना सुद्धा लागू राहील. व नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रातील केंद्र शासनाच्या शासकीय, निम्न शासकीय कार्यालय, सार्वजनिक उपक्रम बँका आदींना ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील.

सर्व मतदान केंद्रावर केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आदी अधिकारी कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली असून एकूण १ हजार ४२५ अधिकारी व कर्मचारी मतदान केंद्रांवर कार्यरत असणार आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता पर्याप्त व पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलींग पार्टी सर्व साहित्यासहित आपआपल्या मतदान केंद्रांवर पोहोचल्या असून मतदान प्रक्रियेसाठी सुसज्ज आहेत. २ डिसेंबर रोजी झालेल्या व २० डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानाची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून करण्यात येणार आहे, असेही श्री. डुडी यांनी सांगितले.



**सरकारी दुर्लक्षाचा आणि व्यावसायिक आडमुठेपणाचा हा भव्य राजवाडा पहा..!**

**रायगड :** दुर्गराज रायगडावर नव्याने बांधलेला, सरकारी दुर्लक्षाचा आणि व्यावसायिक आडमुठेपणाचा हा भव्य राजवाडा पहा..! असे उद्गार युवराज संभाजी छत्रपती यांनी रायगड किल्ल्यावरून काढले

दुर्गराज रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा राजवाडा आज भग्नावस्थेत आहे. त्याचे संवर्धन करायचे म्हटले तरी पुरातत्व विभागाच्या अगणित नियम आणि अटींचे अडथळे आहेत. अगणित बैठका, वारंवार पाठपुरावा आणि लेखी परवानग्या घेतल्याशिवाय पुरातत्त्व विभाग रायगड विकास प्राधिकरणाला गडावरील एक दगडही हलवू देत नाही. पण रोपवे कंपनीस मात्र रायगडावर विनापरवानगी हॉटेल, रेस्टॉरंट, कॅफे आणि सिमेंट कॉंक्रीटचे असे भव्य राजवाडे बांधण्यास खुली मुभा दिली आहे. रोपवे कंपनीने कसलीही परवानगी नसताना गडावर अतिक्रमण करून हॉटेल, कॅफे, रेस्टॉरंट अशी हजारो स्क्वेअर फुटांची मोठमोठी बांधकामे केली आहेत. विशेष म्हणजे पुरातत्व विभागाने काम थांबवण्याच्या नाममात्र नोटिसा दिल्यानंतर देखील त्या डावलून ही कामे पूर्ण करण्यात आली आहेत. एका व्यावसायिक कंपनीकडे इतके धाडस व आडमुठेपणा येतो कुठून ?

जिथे या भारतभूमीने स्वातंत्र्याचा पहिला सूर्य पाहिला, त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजसदरेवर व नगारखान्यावर छत बसविण्याकरिता मी गेले पाच-सात वर्षे दिल्लीत पाठपुरावा करीत आहे, मात्र वास्तुरचनात्मक पुरावे असूनदेखील आजही त्यासाठी परवानगी नाकारली जाते. या ऐतिहासिक वास्तूंना छत नाही, मात्र गडावर विनापरवानगी उभारलेल्या या अनधिकृत हॉटेल्सची विद्रूप छतं जाणिवपूर्वक दुर्लक्षित केली जातात !

गडास भेट देणाऱ्या लाखो शिवभक्तांसाठी आवश्यक अशा मूलभूत सोयी निर्माण करताना पुरातत्व खाते रायगड विकास प्राधिकरणाला अनेक नियमांच्या चौकटी घालते. कित्येक वेळा चालू कामांना स्थगिती दिली जाते. मात्र या व्यावसायिक रोपवे कंपनीस गडावर महागडे हॉटेल, महागड्या आलिशान रूम्स, कॅफे बांधून व्यवसाय करायला खुली सूट देते ! यामागचे गौडबंगाल काय, हे शोधणे गरजेचे आहे.

महाराजांच्या गडावर सरकारी नियम, नोटीसा धुडकावून बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या या आडमुठ्या व्यावसायिक कंपनीला कुणाचे पाठबळ आहे ? रायगडच्या संवर्धनापेक्षा या कंपनीच्या आर्थिक फायद्यास अधिक महत्त्व देण्याची काय गरज आहे, अशा एक ना अनेक प्रश्नांची उत्तरे शोधणे गरजेचे आहे.

नुकताच दुर्गराज रायगड युनेस्को जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित झाला आहे. गडावर अशी बेकायदेशीर बांधकामे होत राहिली तर हे नामांकन देखील धोक्यात येऊ शकते. याला जबाबदार कोण असणार ? केवळ ही कंपनी, वेळीच कठोर कारवाई न करणारा पुरातत्व विभाग, राज्य व केंद्र सरकार की या कंपनीला पाठीशी घालणारे लोक ?

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र गडावर असा उन्मत्त व्यावसायिक अतिक्रमणवाद सहन केला जाणार नाही.

रायगडाच्या अस्मितेपेक्षा मोठे काहीही असू शकत नाही. असे प्रश्न युवराज संभाजी छत्रपती, कोल्हापूर यांनी त्यांच्या अधिकृत फेसबुक पेजवरून सरकारला विचारले.


## सण उत्सवांचा आनंद

कोणत्याही उत्सवाचा आनंद म्हटला कि कल्लाच की हो ! आपल्या भारतीय परंपरेचा अभिमान तो काय? आणि तो विविध सणांतून व्यक्त करण्याचा थाट तो काय? याशिवाय सर्वांसमोर सादर करण्याची कला ती काय? वाह रे वाह! पारंपारिक प्रथेचा आधुनिक ढाचेतील देखावा पाहूनच तर भारतीयांबरोबरच परदेशातील लोकांच्या, पाहुण्या पर्यटकांच्या भुवया उंचावतात. कितीही व्यस्त, व्यग्र शेड्युल असले तरी.. आनंदाने एकमेकांच्या ओढीसाठी ह्या सण उत्सवांनी आपल्याला बांधले आहे आणि तितकेच आनंदीत ठेवले आहे. त्यासाठी जीवाचा आटापिटा करत चाकरमानी आपल्या गावाकडं, घराकड येतो म्हणजे येतोच.

चार गुजगोष्टी, ख्याली-खुशाली यातून बांधीलकीचं नातं पुन्हा नव्यानेच फुलत, बहरत, प्रवाहित राहत आणि आपल्या पुंजीत आनंदाची भर घालत. सणासुदीतले प्रादेशिक पेहेराव, विविधरंगी पोषाख, पूजा, विधी, सोवळ्यातील पावित्र्य, नाद-वाद्यातील आनंदी मंगलमय प्रसन्नता.. विविध प्रकारच्या चवींचे खाद्यांनाचे जिन्नस, सांस्कृतिक आणि गीत-नृत्यातील वैविध्यता,सन्मानाने आदरातिथ्या तील पाहुणचाराने सदैव तत्पर उत्साही, आनंदी भारत मातेला शतशः प्रणाम.

आपुलकी, माया, प्रेम, जिव्हाळा, लळा याहूनही अधिकाधिक माणुसकी जपणाऱ्या माणसांच्या गराड्यातून दुसऱ्यांच्या वा इतरांच्या अडी-अडचणीत सोबत करणाऱ्या व आनंदात आनंद मानणाऱ्या, असणाऱ्या प्रत्येक तृप्त आनंदी रहिवाशाचा हा भारत देश ऋणी आहे आणि आजन्म राहील.

**सौ. पुनम श्रीवल्लभ कालेकर**
**तळेगाव-दाभाडे, पुणे.**







# सामाजिक संस्थांचे कार्य

## "बार्टी"

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टिपटलातून; आपल्या राष्ट्रातील लोकांमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता ही भारतीय संविधानात नमूद केलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, समाजातील वंचित घटकांना अंधश्रद्धा, सांप्रदायिक द्वेष, जातीय पक्षपाताच्या चक्रव्यूहातून बाहेर काढण्यासाठी, पंथ किंवा लिंगावर आधारित असमानता नष्ट करण्यासाठी आणि बंधुता, वैज्ञानिक स्वभाव आणि सांप्रदायिक सलोखा विकसित करण्यासाठी, महाराष्ट्र सरकारने सांस्कृतिक व्यवहार, क्रीडा आणि पर्यटन विभागाने, क्रमांक UTA, 1078 / D-XXV दिनांक २२ डिसेंबर १९७८ रोजी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता विचारपीठ' स्थापन केले. या समतापीठाने १२ मार्च १९७९ रोजी महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ लिमिटेड, मुंबईच्या प्रांगणातून काम सुरू केले. सरकारद्वारे. आदेशानुसार, ११ फेब्रुवारी १९८७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता विचारपीठ पुणे येथे सध्याच्या पत्त्यावर - २८, क्वीन्स गार्डन, पुणे येथे स्थलांतरित करण्यात आले.

ही संस्था नंतर २००८ मध्ये स्वायत्त झाली, तिचे सध्याचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, (महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था) असे नाव देण्यात आले. ही संस्था वैज्ञानिक संशोधन, सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी असलेल्या योजनांचे मूल्यांकन, शासनास धोरणात्मक शिफारसी सादर करणे, प्रशिक्षण, कौशल्य विकास इत्यादी माध्यमातून समानता आणि सामाजिक न्यायासाठी वचनबद्ध आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या ठराव क्रमांक AaPraSa- २००५/ केस क्रमांक ३८३/ MAVAKA दिनांक ३०.४.२००८ नुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे यांना भारतीय सोसायटी नोंदणी कायदा, १८६० आणि भारतीय सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था कायदा, १९५० अंतर्गत नोंदणीसाठी मान्यता देण्यात आली आहे आणि अशा प्रकारे, सोसायटीचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, (बार्टी), पुणे असे ओळखले जाऊ लागले, ज्याचे नोंदणीकृत कार्यालय २८, क्वीन्स गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे - ४११ ००१ येथे आहे.

**उद्दिष्टे / मिशन**

महाराष्ट्रातील अनुसूचित जाती तरुणांना विविध क्षेत्रात काम करण्याची किंवा सुरुवात करण्याची संधी उपलब्ध करून देणे त्यांचे स्वतःचे उत्कृष्ट परिणामांसह सूक्ष्म उपक्रम आणि यशोगाथा तयार करणे.

अनुसूचित जाती समुदायातील वंचित, बेरोजगार, अकुशल, अर्धकुशल प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देणे आणि त्यांना कुशल आणि रोजगारक्षम बनवणे.

समाजात समता विचार विकसित करणे आणि टिकवून ठेवण्याकरिता समता आणि सामाजिक न्याय या विविध क्षेत्रात संशोधन करणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी विचारांचा प्रचार व प्रसार करणे तसेच या समतेच्या विचारांतून प्रेरित विविध योजना, प्रकल्प आणि उपक्रमांची अंमलबजावणी करणे.

महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना ऑनलाइन जात प्रमाणपत्र पडताळणी माहिती प्रणालीद्वारे जात वैधता प्रमाणपत्र प्रदान करण्याची त्रासमुक्त व्यवस्था करणे.

जुन्या जात वैधता प्रकरणां साठी जात वैधता प्रमाणपत्रांचे त्यांच्या सहाय्यक कागदपत्रांसह स्कॅनिंग, डिजिटायझेशन, अनुक्रमणिका, संग्रह आणि शोध घेणे.

सामाजिक न्याय, समता या सर्व संबंधित क्षेत्रांमध्ये प्रोत्साहन देणे तसेच शासनास नव्याने योजना आणि धोरणे तयार करण्यास व त्या सुधारण्यास मदत करणे.

समाजातील विविध घटकांमध्ये बंधुता वाढवणे आणि राष्ट्र एकात्मता स्थापित करणे.

दिलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी पुस्तके, जर्नल्स, नियतकालिके आणि संशोधन पत्रांचे प्रकाशन करणे आणि त्यांची तरतूद करणे.

आंतरविभागीय प्रशिक्षण आयोजित करणे

सांस्कृतिक उपक्रमांमधून चांगले विचार आणि सामाजिक संदेश पोहोचवणे

विविध कार्यक्रम आयोजित करून अनुसूचित जाती समुदायाला सरकारी धोरणे आणि कृतींबद्दल जागरूकता पसरवणे

संशोधनाद्वारे अनुसूचित जातींच्या विकासासाठी प्रामाणिक डेटा संकलित करणे आणि फेलोशिप, सहयोग, परिषदा, चर्चासत्रे आणि कार्यशाळांद्वारे संशोधनाला प्रोत्साहन देणे.

सामाजिक उपक्रमांसाठी निधी गोळा करण्याचे आवाहन करणे.

# शासकीय धोरण/योजना

## आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना
## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

आयुष्मान भारत योजना (Ayushman Bharat Yojana) ही भारत सरकारची एक मोठी आरोग्य योजना आहे, ज्याला प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) म्हणूनही ओळखले जाते, ज्याद्वारे गरीब आणि गरजू कुटुंबांना रू. ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार, हॉस्पिटलायझेशन आणि आरोग्य विमा संरक्षण मिळते, जे देशातील कोणत्याही सरकारी किंवा खाजगी पॅनेल केलेल्या रुग्णालयात कॅशलेस स्वरूपात उपलब्ध आहे. या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या आयुष्मान भारत गोल्डन कार्ड द्वारे नागरिक आरोग्य सेवांचा लाभ घेऊ शकतात आणि आरोग्य नोंदींसाठी ABHA (आयुष्मान भारत आरोग्य खाते) तयार करता येते.

या आरोग्य विमा योजनेत भारतातील सुमारे पन्नास कोटी नागरिकांचा समावेश आहे. आयुष्मान कार्डकडे आधीपासूनच अनेक यशोगाथा आहेत. PMJAY योजनेंतर्गत समाविष्ट फायद्यांमध्ये सर्वात अलीकडील जोड म्हणून, ७० वर्षांपेक्षा जास्त वयाचे सर्व ज्येष्ठ नागरिक, त्यांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी विचारात न घेता पात्र असतील.

आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आयुष्मान कार्ड असणाऱ्या रुग्णांवर सरकारी आणि खाजगी रुग्णालयांमध्ये मोफत उपचार केले जातात. आयुष्मान कार्डसाठी मुख्यत्वे आधार कार्ड आणि रेशन कार्ड (अअध/झकक) आवश्यक आहे, पण अनेकदा फक्त आधार क्रमांक आणि तो लिंक असलेला मोबाइल नंबर पुरेसा असतो, ज्यामुळे तुम्ही उडउ केंद्रावर किंवा ऑनलाइन पोर्टलवर जढझ व्हेरिफिकेशनद्वारे लगेच कार्ड मिळवू शकता, कारण ही योजना डएउउ डेटाबेसमधील पात्र कुटुंबांसाठी आहे

गोल्डन कार्ड म्हणजे आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने (झचगअध) अंतर्गत दिले जाणारे एक डिजिटल आरोग्य ओळखपत्र आहे, जे पात्र कुटुंबांना रू. ५ लाखांपर्यंत मोफत आरोग्य सेवा आणि कॅशलेस उपचारांची सुविधा देते, ज्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना चांगल्या रुग्णालयात उपचार घेणे सोपे होते. हे कार्ड महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठीही आवश्यक आहे आणि ते सरकारी सेवा केंद्रातून काढता येते.

गोल्डन कार्ड (आयुष्मान भारत) साठी ऑनलाइन अर्ज करण्यासाठी, तुम्ही PMJAY च्या अधिकृत वेबसाइट (beneficiary.nha.gov.in) किंवा आयुष्मान भारत ॲप वर जाऊन तुमचा मोबाइल नंबर, आधार किंवा कुटुंबाचा आयडी वापरून लॉग इन करू शकता, तुमची पात्रता तपासा आणि आवश्यक तपशील भरून अर्ज करू शकता. त्यानंतर, आवश्यक कागदपत्रे (आधार, पत्त्याचा पुरावा) सादर करून CSC किंवा हॉस्पिटलमध्ये e-KYC पूर्ण करावे लागते आणि कार्ड डाउनलोड करता येते

राज्यात एकत्रित **आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना** आणि **महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना** याची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी राज्य शासनाने अनेक महत्त्वपूर्ण व रुग्णहिताचे निर्णय घेतले आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना अधिक व्यापक, दर्जेदार आणि कॅशलेस आरोग्य सेवा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. रुग्णांना योजनेबाबत माहिती मिळावी किंवा सेवा घेताना अडचण आल्यास संपर्कासाठी २४ तास कार्यरत टोल फ्री कॉल सेंटर सुरू करण्यात आले आहे.

**दूरध्वनी क्रमांक :**

**155388 / 18002332200 किंवा 14555 / 1800111565**


SARASWAT Arts & Prints
Commercial - Industrial - School - Govt. - Corporate - Banking - Hospital Supplier
▲ Digital Ptg. ▲ Logo Design ▲ I - Card Mfg.
▲ Offset Ptg. ▲ Graphic Design ▲ File Mfg.
▲ Sticker Ptg. ▲ Website Design ▲ Envelop Mfg.
▲ Screen Ptg. ▲ Digital Mrktg. ▲ Brand Development
▲ Packaging Ptg. ▲ Social Media Mrktg ▲ Govt. Supplier
Brand Consultancy Services
496 Shaniwar Peth, Elina Apartment, Shop No. 9, Mehunpura Corner, Opp. Ashirwad Mangal Karyala, , Pune 30
Email : saraswatprints2020@gmail.com
Website : www.saraswatartsandprints.com
020-41257474 / +91-9890336011


**पान क्र. २ वरून संपादकीय**

सूक्ष्म अभ्यासासाठी, तर काही स्थूल वाचनासाठी असतात. अन्य विषयांच्या बाबतीत पाठ्यपुस्तके ही ज्ञानसंग्रह वा ज्ञानकोश या स्वरूपाची असतात. विषयाची क्रमबद्ध मांडणी हा शालेय पाठ्यपुस्तकांचा महत्त्वाचा गुण मानला जातो. काही पाठ्यपुस्तके अभ्यासाच्या दिशा दाखविणारी व स्वतंत्रपणे अभ्यासाला साहाय्य करणारी असतात. प्रौढ विद्यार्थ्यांच्या बाबतीत पाठ्यपुस्तक हे शिक्षक आणि मार्गदर्शक या दोन्ही भूमिका पार पाडू शकते. पाठ्यपुस्तकांचा उपयोग कसा करावा, हेही खरे म्हणजे शिकविले जावे.

पाठ्यपुस्तकांतील प्रस्तावना, विविध भाग, मूळ संहिता, टीका, संदर्भ, स्वाध्याय इत्यादींचा उपयोग कसा करून घ्यावा, याची दिशा विद्यार्थ्यांना कळावयास हवी. पाठ्यपुस्तकांमुळे विद्यार्थी स्वतःच्या गतीने व सवडीने अभ्यास करू शकतात. झालेल्या अभ्यासाची उजळणी करण्यासाठी, त्याचा आढावा घेण्यासाठी, स्मृतीला चालना व उजाळा देण्यासाठी पाठ्यपुस्तकांचा उपयोग होतो.

पाठ्यपुस्तकांचे शिक्षण प्रक्रियेतील स्थान लक्षात घेता त्यांची निर्मिती हे एक महत्त्वाचे व जबाबदारीचे काम आहे. पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीचा विचार इतर पुस्तकांप्रमाणेच अंतरंग व बहिरंगाच्या दृष्टीने करता येईल. आधुनिक काळात या दोहोंची वेगवेगळी तंत्रे निर्माण झालेली आहेत. बहिरंगाचा विचार करताना पुस्तकाचा आकार, कागद, पृष्ठसंख्या, अक्षरांचा आकार, पानावरील मजकुराची मांडणी, चित्रे व पुस्तकांची बांधणी इ. गोष्टींचा सूक्ष्मपणे विचार करण्यात येतो. विद्यार्थ्यांचे वय, त्यांची वाचनशक्ती इ. गोष्टी लक्षात घेऊन वरील तपशिलातील घटकांचे स्वरूप निश्चित केले जाते. ती आकर्षक व रंजक करण्याचा प्रयत्न केला जातो. अंतरंगाच्या बाबतीत पाठ्यक्रम, त्याचे उद्दिष्ट व अध्यापनपद्धती या तीन घटकांचा विचार महत्त्वाचा ठरतो. अभ्यासक्रमात बदल झाला व नव्या नव्या अध्यापनपद्धती पुढे आल्या, की पाठ्यपुस्तकांची पुनर्रचना करावी लागते. ह्या दोन्ही गोष्टी शैक्षणिक संशोधनावर अवलंबून असतात. प्रगमनशील समाजात अभ्यासक्रम व अध्यापनपद्धती यांचे संशोधन सदैव चालूच असते. पाठ्यपुस्तकांच्या अंतरंगाचा दुसरा घटक म्हणजे त्यातील ज्ञान अद्ययावत व बिनचूक असणे व त्याची भाषा संबंधित विद्यार्थ्यांना सुबोध असणे, पाश्चात्य देशांत वेगवेगळ्या वयोगटांच्या व आकलनशक्तीच्या विद्यार्थ्यांसाठी योग्य त्या शब्दांचे संशोधन करून त्या शब्दांच्या याद्या पाठ्यपुस्तक लेखकांना उपलब्ध करून दिल्या जातात. पाठ्यपुस्तक लेखक आपापल्या विषयातील केवळ तज्ञ असून भागत नाही, तर मानसशास्त्र व अध्यापनपद्धती यांचाही अभ्यास त्यांना उपयुक्त ठरतो. अंतरंगातील तिसरा घटक म्हणजे विषय सुबोध करण्यासाठी दिलेली चित्रे, आकृत्या, तक्ते इ. घटक आणि मार्गदर्शनपर विविध टीपा, पूरक वाचनासाठी ग्रंथ इ. गोष्टी होत. हा संपादन-कौशल्याचा भाग समजला जातो. पाठ्यपुस्तकांच्या संपादकांवर जशी अचूक व निर्दोष माहिती पुरविण्याची जबाबदारी असते. तशीच ती माहिती वस्तुनिष्ठ, निःपक्षपाती आणि समतोल असावी लागते. यूनेस्कोने या दृष्टीने विविध देशांतील इतिहासाची पुस्तके तज्ञांकडून तपासून घेऊन योग्य त्या सूचना केल्या आहेत. पाठ्यापुस्तकांचे मूल्यमापन करण्यासाठी संशोधकाना आता गुणपत्रिका (स्कोअर-कार्ड्स) दिल्या जातात.

अश्यातच महाराष्ट्र शासनाच्या शालेय पाठ्यपुस्तक निर्मिती व प्रकाशनाची जबाबदारी सांभाळणाऱ्या 'बालभारती' संस्थेने बुधवारी नागपूरमध्ये मोठी कारवाई केली. हिंगणा MIDC परिसरातील दिग्दोह येथील प्रिंटिंग प्रेसवर छापा टाकण्यात आला. या कारवाई दरम्यान हजारो पाठ्यपुस्तके बेकायदेशीररीत्या छापली जात असल्याचे उघडकीस आले.

**एकीकडे महाराष्ट्राच्या शैक्षणिक राजधानीमध्ये पुस्तक महोत्सव चालू असताना, दुसरीकडे महाराष्ट्राच्या उप-राजधानीमध्ये शासकीय पुस्तकांचे नकली पुस्तकांच्या छपाईमुळे हिवाळी अधिवेशन खरच गरम झाले नाही, यातच आपण स्वत:ला धन्य मानण्यात काही गैर नाही......**

## राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून ४८ लाखांचा अवैध मद्य मुद्देमाल जप्त



पुणे : परराज्यातून महाराष्ट्रात होणाऱ्या अवैध मद्याच्या तस्करीविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभागाने सापळा रचून दोन स्वतंत्र कारवाया केल्या असून एकूण पाच आरोपींना अटक करून वाहनांसह सुमारे ४८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

उरुळी कांचन गावाच्या हद्दीत पुणे-सोलापूर रोडवर गोपनीय माहितीच्या आधारे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, के विभाग, पुणे पथकाने चारचाकी वाहन (MH 12-MR-1904) तपासले. वाहनातून गोवा राज्य निर्मित विदेशी मद्याच्या विविध ब्रँडच्या मोठ्या प्रमाणात बाटल्या आढळून आल्या. वाहनचालकास अटक करण्यात आली. पुढील तपासात मुख्य सूत्रधारास करमाळा (जि. सोलापूर) येथून अटक करण्यात आली. या प्रकरणात एकूण तीन आरोपींना अटक करून वाहनासह सुमारे ४ लाख ७१ हजार ७८० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सासवड विभागाच्या पथकाने सातारा-पुणे राष्ट्रीय महामार्गावर सारोळा गावाच्या हद्दीत सापळा रचून सहाचाकी ट्रक (MH12-SF-5918) तपासला. औषधांच्या आडून गोवा राज्यात विक्रीसाठी असलेले विदेशी मद्य वाहतूक होत असल्याचे उघडकीस आले. पुढील तपासात एक ट्रक, चारचाकी वाहनासह मोठ्या प्रमाणात मद्य जप्त करण्यात आले. या प्रकरणात दोन आरोपींना अटक करून वाहनांसह एकूण ४३ लाख ५७ हजार ४०० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई राजेश देशमुख, सह-आयुक्त (अंमलबजावणी व दक्षता) प्रसाद सुर्वे तसेच विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभाग, पुणे सागर धोमकर यांच्या आदेशानुसार आणि अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे अतुल कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

अवैध मद्याबाबत कोणतीही माहिती असल्यास नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८००-२३३-९९९९ किंवा दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२७३२१ वर संपर्क साधावा, असे आवाहनही राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात आले आहे.

## "काव्य श्रीमंती"
## "सामाजिक आढावा"

कोणी घेतला कधी कोणत्या
गोष्टीचा शोध नवा।
तर कोणी केला या समाजासाठी
मोठ्या पासून छोट्या गोष्टी
पर्यंतचा धावा।

भगत सिंगाचे बलिदान असो,
की भीष्माने केलेला त्याग असो,
छत्रपती शिवरायांनी स्वराज्य
निर्मितीसाठी घेतलेली शपथ असो,
अथवा छत्रपती संभाजींनी केलेले
सर्वस्वी अर्पण असो,

महात्मा ज्योतिराव आणि सावित्री
बाईंनी सामाजिक सुधारण्यासाठी
केलेली चळवळ असो,
की महात्मा गांधींनी स्वातंत्र्यासाठी
केलेला स्वातंत्र्यसंग्राम असो,

धोंडो केशव कर्वे यांनी महिलांच्या
हक्कासाठी दिलेला लढा असो,
की लोकमान्य टिळकांनी दिलेली
स्वराज्याची गर्जना असो,

बाबासाहेबांनी मानव ते महामानव
होण्यापर्यंतचा केलेला संपूर्ण प्रवास
असो,
की त्यांनी निर्मिलेली संपूर्ण विश्वात
गौरवलेली आपल्या भारताची घटना
असो,

नेहरूंपासून मोदींपर्यंत दिलेले प्रत्येक
प्रधानमंत्र्यांचे योगदान असो,
की राजेंद्रप्रसादां पासून द्रौपदी मुर्मू चे
सरसेनापतीचा पदभार असो,

वेळो वेळी देश रक्षणासाठी
जवानांनी केलेला प्राण त्याग असो,
की अनेक समाज सेवकांनी
केलेले सामाजिक कार्य असो,

सर्वांनी समाजासाठी केला एकच
धावा,
आजही अनेक कार्यकर्ते, राजकर्ते,
साहित्यिक आणि जवान
समाजासाठी करीत आहेत अविरत
सेवा,

या सर्वांचा आम्ही घेतो मागोवा,
आणि समाजात घडणाऱ्या प्रत्येक
महत्त्वाच्या घटनांचा आम्ही करतो
पाठपुरावा,
याचसाठी सदैव तत्पर आहे

**आपला हा सामाजिक आढावा,**
**आपला हा सामाजिक आढावा.**

**कवी : श्रीवल्लभ कालेकर** (६ डिसेंबर २०२५ रोजी सामाजिक आढावा च्या प्रकाशननिमित्त केलेली कविता)


वितरक व पत्रकार नेमणे आहे, तसेच लेख-कविता व जाहिरातीसाठी खाली संपर्क करावा
E-mail :samajikaadhawa@gmail.com
Whatsapp Mob. 9921 924 924


या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्य कोठेही नाही.